नियमीत दिवाणी दावा क्रमांक १३/२०२१
निशाण क्रमांक ८२ / क सोबत

वादी तर्फे वकील एम. व्ही. पाटील यांचे मार्फत प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्रमांक १ फिलीप्स फ्रान्सीस लोबो याचा उलट तपास सुरु

४. गणूला दोन भाऊ आहेत. त्याची नावे मला आज आठवत नाहीत. वादातील मिळकतीचा गट नंबर २१ आहे. त्याचा जुना गट नंबर मला माहित नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, यशवंतनगर तुडीये असा राजमार्ग गेलेला आहे. हे मला माहित नाही की, सदरील राजमार्गावरुन गट नंबर २१ चे पूर्व पश्चिम असे दोन तुकडे झालेले आहेत. यशवंतनगर तुडीये राजमार्गाच्या उत्तर पूर्व कोप-यात घर बांधलेले आहे. त्या घरामध्ये बाबाजी, त्याची पत्नी व त्याचे कुंटूबीय राहतात. त्या जमीनीच्या दक्षिण पूर्व बाजूस त्या गटातील उर्वरीत शेत जमीन आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, ती शेत जमीन बाबाजी व त्याची मुले कसून खातात. ते क्षेत्र एकूण १ एकर आहे का हे मला माहित नाही. बाबाजीच्या घराच्या दक्षिणेच्या बाजूस १ एकर जमीनीची पट्टी आहे. ती १ एकर जमीन विश्वनाथ कसतो. बाबाजी व विश्वनाथ याच्या दोन एकर क्षेत्राच्या उत्तर दक्षिण रस्त्याच्या पश्चिमेकडे दोन एकर क्षेत्राची पट्टी आहे. सदरील जागेच्या उत्तर पश्चिम कोप-यामध्ये पूर्वी जनावरे बांधण्याचे घर होते आता तेथे ते घर नाही. सदरील दोन एकर च्या उत्तर बाजूस उंबळकर याची जमीन आहे. मी गोपाळ रामू गावडे ला ओळखत नाही. मी आप्पा रामू गावडे ला ओळखतो. आप्पा रामू गावडे याच्या भावाचे नाव गोपाळ रामू गावडे आहे. वादातील क्षेत्रातील दक्षिणेच्या बाजूस गोपाळ रामू गावडे याचे शेत आहे. त्या जमीनीमध्ये गोपाळ रामू गावडे पिके घेतात. सदरील जमीनीच्या दक्षिण बाजूस त्याचा भाऊ आप्पा याची जमीन आहे. ती जमीन आप्पा स्वता कसतो. सोमान्ना यांना मी ओळखत नाही. आप्पाच्या जमीनीच्या दक्षिण बाजूस भरमू याची शेत जमीन आहे. भरमूच्या वडीलाचे नाव विठ्ठल आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, भरमूच्या शेतजमीनीच्या दक्षिण बाजूस संजय याची जमीन आहे. पांडूरंग यांना मी ओळखतो. हे म्हणणे बरोबर आहे की, पांडूरंग याची जमीन संजयच्या दक्षिणेकडे आहे. भरमा विठ्ठल हा त्याच्या हिश्याची जमीन स्वंतत्र कसतो. त्याचप्रमाणे संजय

गावडे त्याच्या हिश्याची जमीन स्वंतत्र कसतो. तसेच पांडूरंग देखील त्याच्या हिश्याची जमीन स्वंतत्र कसतो. हे म्हणणे बरोबर आहे की, सदरील वहिवाट फार वर्षापूर्वीपासूनची आहे.

५. वादी व प्रतिवादी याच्या मधील वाद मला माहिती आहे. मी बाळकृष्ण जाधव यांना ओळखत नाही. मी संदीप जाधव यांना ओळखतो. हे मला माहित नाही की, उत्तर पश्चिम कोप-यातील घर काही वर्षापूर्वी जेसीबी लावून पाडण्यात आले. सदरील घर पडले आहे किंवा नाही हे मला माहित नाही. मी माझ्या वकीलांना वाळवी लागून झोपडी पडल्याचे जबाब तयार करताना सांगीतले होते. विश्वनाथ व बाबाजी याच्या विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार झाली होती याबाबत मला माहिती नाही. वाद मिळकत ही एकूण २१ एकराची आहे. बाबाजी यांनी मला २१ एकरामध्ये वाद चालू आहे असे सांगीतले. मला गट नंबर ८० च्या मिळकती बाबत माहिती नाही. साक्षीदार पून्हा सांगतो की, मला गट नंबर ८० बाबत माहिती आहे. गट नंबर ८० ही जाधव याच्या मालकीची आहे. दोन एकरच्या मिळकतीच्या पूर्वेस - यशवंतनगर तुडीये रस्ता आहे. पश्चिमेस - निंगाप्पा पोवार याची जमीन आहे. दक्षिणेस - गोपाळ गावडे याची जमीन आहे. उत्तरेस - उंबळकर याची शेत जमीन आहे. हे मला माहित नाही की, या चतुसिमे अंतर्गत आज ऊसाचे पिक आहे. सदरील क्षेत्रामध्ये पूर्वी देखील ऊसाचे पिक नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, बाबाजी व विश्वनाथ यांनी मला बोलविले. मला बाबाजीने बोलविले.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक १०/०२/२०२६ सही/-

( न.श्री.पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
**गडहिंग्लज**